IMPACT FACTOR 5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Journal

ISSN 2455-4375

# गोंदिया जिल्हयातील ग्रामीण – नागरी लोकसंख्या आणि व्यावसायीक संरचनेचे सुक्ष्म स्तरीय अध्ययन

**प्रा. भोजराज एम. पुस्तोडे**
स्व. निर्धन पाटील वाघाये महा. सौंदड,
ता. सडक अर्जुनी , जि. गोंदिया

---

**सारांश :**

वाढत्या लोकसंख्येमुळे गोंदिया जिल्हयातील विविध व्यवसायात रोजगार विषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे जिल्हयातील तरूणांना स्थायी रोजगाराच्या ठीकाणी आंशिक रोजगार मिळत आहेत. गोंदिया जिल्हयातील ग्रामीण–नागरी लोकसंख्या आणि व्यावसायीक संरचनेचे अध्ययन करण्याच्या उद्देशाने हा अभ्यास हाती घेतला आहे. जिल्हयात किती लोकसंख्या क्रियाशील व किती लोकसंख्या अवलंबीत आहे आणि ती कोणकोणत्या कार्यात गुंतलेली आहे. यावरून व्यावसायीक संरचना समजते आणि या व्यावसायीक संरचने वरून जिल्हयाची आर्थिक स्थिती स्पष्ट होते. तसेच ग्रामीण–नागरी लोकसंख्येच्या मानाने विविध व्यवसायातील उपलब्ध रोजगार किती व कोणत्या स्वरूपाचे आहे. रोजगाराचा विकास कसा करता येईल या दृष्टीकोनातुन प्रस्तुत निबंध लिहीण्याचा प्रयत्न केला आहे. जिल्हयातील ग्रामीण–नागरी लोकसंख्या व व्यावसायीक संरचनेचे अध्ययन , त्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजनांचे विश्लेषण केले आहे. गोंदिया जिल्हयातील विविध व्यवसायांच्या विकासासाठी लागणारा मुलभुत आधार मजबुत आहे. ,शासनाने जिल्हयातील उद्योगांच्या गरजा जाणुन मदतीचा हात दिला तर कृषी व कृषी आधारीत तसेच इतर व्यवसाय जलदगतीने विकसीत होऊन मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल.

---

**प्रस्तावना :**

गोदिया जिल्हा हा महाराष्ट्राच्या उत्तर पुर्वेकडील जिल्हा असुन पुर्वी हा जिल्हा भंडारा जिल्हयाचा भाग होता. १ मे १९९९ मध्ये भंडारा जिल्हयाचे विभाजन होउन गोंदिया जिल्हयाची निर्मीती झाली. गोंदिया जिल्हयात शहरापेक्षा खेडयात राहणारी लोकसंख्या जास्त आहे. काही तालुक्यात तर नागरी लोकसंख्याच नाही येथील लोकसंख्या मोठया प्रमाणात कृषी व कृषीवर आधारीत व्यवसायात गुंतलेली असुन या जिल्हयातील २००१ नुसार ८८.५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात निवास करणारी होती. तर ११.९५ टक्के लोकसंख्या शहरी भागात निवास करणारी होती. तसेच २०११ नुसार ८२.९ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात निवास करणारी तर १७.१ टक्के लोकसंख्या शहरी भागात निवास करणारी आहे.

जिल्हयातील बरीचशी लोकसंख्या शेतीशी व इतर प्राथमिक व्यवसायाशी निगडीत असल्यामुळे ग्रमीण लोकसंख्या जास्त असुन नागरी लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे. लोक आपली आर्थिक गरज भागविण्यासाठी अनेक व्यवसाय करतात. त्या वेगवेगळया व्यवसायात किती लोक गुंतलेले आहेत याचे अध्ययन करणे गरजेचे आहे. गोंदिया जिल्हयातील अर्थव्यवस्था कृषीवर आधारीत असुन येथे ८ तालुके आहेत. त्यातील काही भाग विकसीत तर काही भाग मागासलेला आहे. या क्षेंत्राची कार्यक्षमता कीती आहे. जिल्हयात कीती क्रियाशील लोकसंख्या आहे व किती अवलंबीत लोकसंख्या आहे तसेच ती लोकसंख्या कोणकोणत्या

कार्यात गुंतलेली आहे. यावरून व्यवसायी संरचना समजते. कोणत्याही जिल्हयातील व्यावसायीक संरचनेनुसार त्या जिल्हयाची आर्थिक स्थिती स्पष्ट होते. जिल्हयातील एकुण लोकसंख्येत क्रियाशील व अक्रियाशील लोकसंख्येवरून जिल्हयातील श्रमशक्ती समजुन येते. गोंदिया जिल्हयातील २००१ ते २०११ या काळातील व्यावसायीक संरचना स्पष्ट करण्यात आलेली आहे. २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील एकुण लोकसंख्या ५७९५९६ म्हणजे ४८.२७ टक्के होती तर अक्रियाशील लोकसंख्या ६२११११ म्हणजे ५१.७३ टक्के होती. तसेच २०११ प्रमाणे जिल्हयातील एकुण क्रियाशील लोकसंख्या ६६५४१९ म्हणजे ५०.३१ टक्के आहे तर अक्रियाशील लोकसंख्या ६५७०८८ म्हणजे ४९.६९ टक्के आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे विविध व्यवसायातील रोजगारावर परिणाम झाला असला तरी येथील व्यवसायाचा विकासाला भरपुर वाव आहे. हा दृष्टीकोन समोर ठेवुन प्रस्तुत शोध निबंधात गोंदिया जिल्हयातील ग्रामीण नागरी लोकसंख्या आणि व्यावसायीक संरचनेचा अध्ययन करण्यासाठी निवड करण्यात आलेली आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

प्रस्तुत अध्ययनाकरीता महाराष्ट्रातील गोंदिया जिल्हयाची निवड केली आहे. हा महाराष्ट्राच्या ईशान्य भागात (उत्तर–पुर्व) वैनगंगा नदीच्या खोऱ्यात वसलेला आहे. या जिल्हयात आठ तालुके असुन यांचे अक्षवृत्तीय विस्तार २०.३९ ते २१.३८ उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७९.२७ ते ८०.४२ पुर्व या दरम्यान पसरलेला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार गोंदिया जिल्हयाचे क्षेत्रफळ ५२३४ चौ.कि.मी. आहे. ते राज्याच्या एकुण क्षेत्रफळाच्या १.७ टक्के आहे. गोंदिया जिल्हयाचे पुर्वेस राजनांदगाव जिल्हा (छत्तीसगड), पश्चिमेस भंडारा जिल्हा, उत्तरेस बालाघाट जिल्हा (मध्यप्रदेश), आणि दक्षिणेस गडचिरोली जिल्हा आहे.




Map of Gondia District

**अभ्यासाचा उद्देश :**

- गोंदिया जिल्हयातील ग्रामीण – नागरी लोकसंख्येचे तालुकानिहाय अध्ययन करणे
- गोंदिया जिल्हयातील व्यावसायीक संरचनेचे सुक्ष्म स्तरीय अध्ययन करणे.
- गोंदिया जिल्हयातील रोजगार विषयक समस्या व उपाययोजना सुचविणे.

**परिकल्पना :**

गोंदिया जिल्हयातील कृषी व कृषी आधारीत व्यवसाय आणि इतर उद्योगातील नियमित रोजगाराचे घटते प्रमाण ही एक ज्वलंत समस्या आहे. जोपर्यंत कृषी व कृषी आधारीत व्यवसाय आणि इतर उद्योगांचा

विकास केला जात नाही तोपर्यंत जिल्हयातील रोजगारविषयक समस्या दूर होणार नाही ही परिकल्पना गृहीत धरून हा शोध निबंध हातात घेतला आहे.

**संशोधन पध्दती :**

गोंदिया जिल्हयातील कृषी व कृषीवर आधारीत व्यवसाय व इतर उद्योगातील रोजगाराचे अध्ययन करून जिल्हयातील नियमित रोजगाराची कमतरता या समस्येवर उपाय योजना करण्यासाठी अध्ययन प्रत्यक्ष भेट देउन , निरीक्षण करून , प्राथमिक आकडेवारी गोळा केली जाईल तर दुय्यम आकडेवारी शासनाच्या सांख्येकीक विभागातर्फे प्रकाशीत होणारे वेगवेगळे प्रकाशन , लेख , जनगणना पुस्तीका , जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन , जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया , विविध प्रकाशीत व अप्रकाशीत माहीती तसेच संशोधन कार्याचा संदर्भ इंटरनेट वरून घेतला जाईल.

**गोंदिया जिल्हयातील तालुका निहाय ग्रामीण – नागरी लोकसंख्या वर्ष २००१ ते २०११**

| अ. क्र. | तालुके | २००१ | | | | २०११ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण ग्रामीण लोकसंख्या | शेकडा प्रमाण | एकुण नागरी लोकसंख्या | शेकडा प्रमाण | एकुण ग्रामीण लोकसंख्या | शेकडा प्रमाण | एकुण नागरी लोकसंख्या | शेकडा प्रमाण |
| १ | गोंदिया | २५०८४४ | ६७.४८ | १२०९०२ | ३२.५२ | २५८५७४ | ६१.३ | १६३०७६ | ३८.७ |
| २ | तिरोडा | १४२९८७ | ८६.३९ | २२५२९ | १३.६१ | १५१०७३ | ८५.७ | २५१८१ | १४.३ |
| ३ | गोरेगाव | ११६६८५ | १०० | ०.० | ०.० | १२४८९० | १०० | ०.०० | ०.०० |
| ४ | आमगाव | १२२५०४ | १०० | ०.० | ०.० | ११२७६० | ८६.३ | १७८९७ | १३.७ |
| ५ | सालेकसा | ७७६९० | १०० | ०.० | ०.० | ८५४८२ | ९४.३ | ५१९७ | ५.७ |
| ६ | सडक अर्जुनी | १०७४९३ | १०० | ०.० | ०.० | ११५५९४ | १०० | ०.०० | ०.०० |
| ७ | अर्जुनी मोर | १३६९८० | १०० | ०.० | ०.० | १४८२६५ | १०० | ०.०० | ०.०० |
| ८ | देवरी | १०२०९३ | १०० | ०.० | ०.० | ९९९३९ | ८७.३ | १४५७९ | १२.७ |
| एकुण | | १०५७२७६ | ८८.०५ | १४३४३१ | ११.९५ | १०९६५७७ | ८२.९ | २२५९३० | १७.१ |

**आधार :–** जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन वर्ष २००९ व २०११ जनगणना २००१ व २०११

वरील सारणी वरून गोंदिया जिल्हयातील एकुण लोकसंख्येचे ग्रामीण व नागरी स्वरूप समजुन घेण्यासाठी जिल्हयातील तालुकानिहाय ग्रामीण व नागरी लोकसंख्या २००१ मध्ये गोंदिया तालुक्यात ६७.४८ टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि ३२.५२ टक्के नागरी लोकसंख्या होती. तर २०११ ला ६१.३ टक्के ग्रामीण लोकसंख्या व ३८.७ नागरी लोकसंख्या झाली आहे. तसेच तिरोडा तालुक्यात २००१ मध्ये ८६.३९ टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि १३.६१ टक्के नागरी लोकसंख्या होती. तर २०११ ला ८५.७ टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि १४.३ टक्के नागरी लोकसंख्या झालेली आहे. गोरेगाव तालुक्यात २००१ मध्ये १०० टक्के

ग्रामीण लोकसंख्या आणि ०.०० टक्के नागरी लोकसंख्या होती. तर २०११ ला १०० टक्के ग्रामीण लोकसंख्या व ०.०० टक्के नागरी लोकसंख्या आहे. तसेच आमगाव

तालुक्यातील २००१ मध्ये १०० टक्के ग्रामीण लोकसंख्या व ०.०० टक्के नागरी लोकसंख्या होती. तर २०११ ला ८६.३ टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि १३.७ टक्के नागरी लोकसंख्या झाली आहे. सालेकसा तालुक्यात २००१ मध्ये १०० टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि ०.०० टक्के नागरी लोकसंख्या होती तर २०११ ला ९४.३ टक्के ग्रामण लोकसंख्या आणि ५.७ टक्के नागरी लोकसंख्या झाली आहे. तसेच सडक अर्जुनी तालुक्यात २००१ मध्ये १०० टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि ०.०० टक्के नागरी लोकसंख्या आहे.

अर्जुनी /मोर तालुक्यात २००१ मध्ये १०० टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि ०.०० टक्के नागरी लोकसंख्या होती तर २०११ ला १०० टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि ०.०० टक्के नागरी लोकसंख्या आहे. तसेच देवरी तालुक्यात २००१ मध्ये १०० टक्के ग्रामीण लोकसंख्या आणि ०.०० टक्के नागरी लोकसंख्या होती तर २०११ ला ८७.३ टक्के ग्रमिण लोकसंख्या आणि १२.७ टक्के नागरी लोकसंख्या आहे.

वरील प्रमाणे गोंदिया जिल्हयातील नागरी लोकसंख्या २००१ च्या मानाने २०११ मध्ये वाढलेली दिसुन येते तसेच जिल्हयातील गोरेगाव , सडक अर्जुनी , व अर्जुनी मोर या तीन तालुक्यात नागरी लोकसंख्या दिसुन येत नाही. परंतू उर्वरीत गोंदिया , तिरोडा , आमगाव , सालेकसा व देवरी या पाच तालुक्यात नागरी लोकसंख्येचे प्रमाण वाढलेले दिसुन येते. याचे मुख्य कारण शहराकडे मिळणारी नोकरी , व्यवसाय व इतर सोई सुविधा आहेत. तरीपण दुर्गम डोंगराळ जंगलयुक्त भागात राहणारी मोठी लोकसंख्या ही ग्रामीण भागात निवास करते.

**गोंदिया जिल्हयातील व्यवसायीक संरचना वर्ष २००१ ते २०११**

| अ. क्र. | व्यवसाय | २००१ | | | | २०११ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुख्य कामगार | शेकडा प्रमाण | सिमांतीक कामगार | शेकडा प्रमाण | मुख्य कामगार | शेकडा प्रमाण | सिमांतीक कामगार | शेकडा प्रमाण |
| १ | शेतकरी | १३६१५३ | ११.३४ | ४७०४५ | ३.९२ | १३७१८३ | १०.३७ | ४९३२६ | ३.७३ |
| २ | शेतमजुर | १०४७२७ | ८.७२ | १०५७३८ | ८.८१ | १४७३६६ | ११.१४ | १३४०४८ | १०१४ |
| ३ | वस्तू निर्माण सेवा दुरूस्त्या व घरगुती उद्योग | ३८७११ | ३.२२ | १८२५५ | १.५२ | २०३५४ | १.५४ | १२१७१ | ०.९२ |
| ४ | इतर उद्योग | ११२२९९ | ९.३५ | १६६६८ | १.३९ | १२९०५९ | ९.७६ | ३५९१२ | २.७२ |
| ५ | एकुण कामगार | ३९१८९० | ३२.६४ | १८७७०६ | १५.६३ | ४३३९६२ | ३२.८१ | २३१४५७ | १७.५० |
| ६ | एकुण क्रियाशील लोकसंख्या | ३९१८९० + १८७७०६ = ५७९५९६(४८.२७ %) | | | | ४३३९६२ + २३१४५७ = ६६५४१९ (५०.३१ %) | | | |
| ७ | एकुण अक्रियाशिल लोकसंख्या | १२००७०७ –६२२११११ (५१.७३ %) | | | | १३२२५०७ – ६६५४१९ = ६५७०८८ (४९.६९%:) | | | |

**आधार :** जल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन वर्ष २००९ व २० जनगणना २००१ व २०११

वरील सारणी वरून स्पष्ट होते की , गोंदिया जिल्हयातील २००१ च्या जनगणने नुसार एकुण लोकसंख्येत शेतकरी मुख्य कामगार १३६१५३ म्हणजे ११.३४ % तर सिमांतीक कामगार ४७०४५ म्हणजे ३.९२ % होते तसेच २०११ नुसार एकुण लोकसंख्येत शेतकरी मुख्य कामगार १३७१८३ म्हणजे १०.३७ % तर सिमांतीक कामगार ४९३२६ म्हणजे ३.७३ % आहेत.

२००१ नुसार एकुण लोकसंख्येत शेतमजुर मुख्य कामगार १०४७२७ म्हणजे ८.७२ : तर सिमांतीक कामगार १०४७२७ म्हणजे ८.७२ % तर सिमांतिक कामगार १०५७३८ म्हणजे ८.७२ % होते. तसेच २०११ नुसारएकुण लोकसंख्येत शेतमजुर मुख्य कामगार १४७३६६ म्हणजे ११.१४ % तर सिमांतीक कामगार १३४०४८ म्हणजे १०.१४ % आहेत.

२००१ नुसार एकुण लोकसंख्येत वस्तु निर्माण , सेवा दुरूस्त्या व घरगुती उद्योग यातील मुख्य कामगार ३८७११ म्हणजे ३.२२ % तर सिमांतीक कामगार १८२५५ म्हणजे १.५२ % होते तसेच २०११ नुसार एकुण लोकसंख्येत वस्तु निर्माण , सेवा दुरूस्त्या व घरगुती उद्योग यातील मुख्य कामगार २०३५४ म्हणजे १.५४ % तर सिमांतीक कामगार १२१७१ म्हणजे ०.९२ % आहेत.

२००१ नुसार एकुण लोकसंख्येत इतर उद्योग यातील मुख्य कामगार ११२२९९ म्हणजे ९.३५ % तर सिमांतीक कामगार १६६६८ म्हणजे १.३९ % होते. तसेच २०११ नुसार एकुण लोकसंख्येत इतर उद्योग यातील मुख्य कामगार १२९०५९ म्हणजे ९.७६ % तर सिमांतीक कामगार ३५९१२ म्हणजे २.७२ % आहेत.

२००१ नुसार एकुण लोकसंख्येत जिल्हयातील सर्व व्यवसायातील एकुण मुख्य कामगार ३९१८९० म्हणजे ३२.६४ % आणि सर्व व्यवसायातील एकुण सिमांतीक कामगार १८७७०६ म्हणजे १५.६३ % होते. २०११ नुसार एकुण लोकसंख्येत जिल्हयातील सर्व व्यवसायातील एकुण मुख्य कामगार ४३३९६२ म्हणजे ३२.८१ % आणि सर्व व्यवसायातील एकुण सिमांतीक कामगार २३१४५७ म्हणजे १७.५० % आहेत.

२००१ नुसार जिल्हयातील मुख्य कामगार व सिमांतीक कामगार मिळुन एकुण क्रियाशील कामगार ५७९५९६ म्हणजे एकुण लोकसंख्येच्या ४८.२७ % आहेत. आणि उर्वरीत लोकसंख्या ६२२१११ म्हणजे ५१.७३ % लोकसंख्या जिल्हयात अक्रियाशील आहे. २०११ नुसार जिल्हयातील मुख्य कामगार व सिमांतीक कामगार मिळुन एकुण क्रियाशील कामगार ६६५४१९ म्हणजे एकुण लोकसंख्येच्या ५०.३१ % आहेत. आणि उर्वरीत लोकसंख्या ६५७०८८ म्हणजे ४९.६९ % लोकसंख्या जिल्हयात अक्रियाशील आहे.

वरील विवेचनावरून गोंदिया जिल्हयातील विविध व्यवसायात २००१ पेंक्षा २०११ मध्ये वाढत्या लोकसंख्ये बरोबर मुख्य कामगार आणि सिमांतीक कामगाराच्या संख्येत वाढ झाली असली तरी एकुण लोकसंख्येच्या तुलनेत शेतकऱ्यांची टक्केवारी कमी होऊन शेतमजुराची टक्केवारी वाढली आहे. वस्तु निर्माण , सेवा दुरूस्त्या व घरगुती उद्योगातील कामगाराची ही टक्केवारी कमी झाली आहे. मात्र इतर उद्योगातील कामगाराची टक्केवारी वाढली आहे.

तसेच एकुण लोकसंख्येत मुख्य कामगाराची टक्केवारी घटुन सिमांतीक कामगाराची टक्केवारी वाढली आहे. म्हणजे लोकसंख्येच्या तुलनेत जिल्हयातील नियमित रोजगारात घट झाली आणि आंशीक रोजगारात

वाढ झाली आहे. जिल्हयातील नियमित रोजगार कमी होणे ही एक समस्याच आहे. म्हणुन शासनाने जिल्हयातील तरूणांना नियमित रोजगार मिळेल यासाठी उपाय योजना करणे काळाची गरज आहे.

**समस्या :**

- वाढत्या लोकसंख्ये बरोबर गोंदिया जिल्हयातील वेगवेगळया तालुक्यात कमी अधिक प्रमाणात नागरीकरण होत आहे. त्यामुळे जिल्हयात असमतोल दिसुन येतो.
- गोंदिया जिल्हयातील विविध व्यवसायात २००१ पेक्षा २०११ मध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे मुख्य कामगार आणि सिमांतीक कामगाराच्या संख्येत वाढ झाली परंतू एकुण लोकसंख्येच्या तुलनेत शेतकऱ्यांची टक्केवारी कमी होऊन शेतमजुरांची टक्केवारी वाढली आहे.
- वस्तू निर्माण उद्योग , सेवा दुरूस्ती उद्योग व घरगुती उद्योगातील कामगारांची टक्केवारी लोकसंख्येत वाढ होऊनही कमी झाली आहे. कारण विद्यमान व्यवसायाची स्थिती फार चांगली नाही आहे.
- शासनाच्या अनास्थेमुळे गोंदिया जिल्हयातील एकुण लोकसंख्येत मुख्य कामगाराची टक्केवारी घटुन सिमांतीक कामगाराची संख्या वाढत आहे.
- जलद गतीने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे जिल्हयातील नियमित रोजगार लोकसंख्येच्या तुलनेत कमी झाले असुन यामुळे जिल्हयात रोजगार विषयक समस्या निर्माण झाली आहे.

**उपाययोजना :**

- गोंदिया जिल्हयातील तालुकानिहाय नागरीकरणातील असमतोल दुर करण्यासाठी सरकारने अविकसीत भागात नवे उद्योग स्थापन करायला हवे.
- जिल्हयातील २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये वाढलेल्या लोकसंख्येमुळे मुख्य कामगार व सिमांत कामगाराच्या संख्येत झालेल्या वाढीनुसार रोजगार निर्माण होण्यासाठी सरकारने जुन्या उद्योगांना प्रोत्साहन पॅकेज देऊन त्यांचा आकार व विस्तार वाढवायला हवे.
- शेतकऱ्यांची घटती संख्या व शेतमजुराच्या वाढत्या संख्येला वेळीच आळा घालण्यासाठी जलद गतीने वाढणाऱ्या लोकसंख्येला नियंत्रणात आणणे गरजेचे आहे.
- वस्तू निर्माण , सेवा दुरूस्ती व घरगुती उद्योगातील कामगारांची घटणारी टक्केवारी वाढविण्यासाठी अशा उद्योगात मोठया प्रमाणात गुंतवणुक , आधुनिक यंत्र व प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करायला पाहीजे.
- एकुण लोकसंख्येत मुख्य कामगाराची टक्केवारी घटुन सिमांतीक कामगाराची टक्केवारी वाढलेली आहे. यासाठी उद्योगांची क्षमता वाढवुन पुर्ण वेळ रोजगार निर्माण करणे आवश्यक आहे.
- जिल्हयातील नियमित रोजगार वाढविण्यासाठी विद्यमान उद्योगांना चालना देऊन त्यांचा विकास करून रोजगारात वाढ करणे

**निष्कर्ष :**

गोंदिया जिल्हयात मोठया प्रमाणात कृषी व कृषीवर आधारीत व्यवसाय आणि ईतर उद्योग आहेत. जिल्हयात वाढत्या लोकसंख्येमुळे कामगारांची संख्या वाढलेली आहे. परंतू त्या प्रमाणात विविध व्यवसायातील रोजगार मात्र वाढलेले नाही त्याचा परिणाम अनेक कामगारांना पूर्ण वेळ स्थायी रोजगार मिळत नसुन यामुळे

एकुण लोकसंख्येत नियमित मुख्य कामगारांची संख्या घटली आहे आणि आंशिक कामगारांची संख्या वाढली आहे.

जिल्हयातील मोडकळीस आलेल्या उद्योगांना गती प्रदान करण्यासाठी त्या उद्योगांच्या समस्यांवर उपाय करून व्यावसायीकांना विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच जिल्हयात जलद गतीने वाढणाऱ्या लोकसंख्येला नियंत्रणात आणुन तरूणांना नियमित रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासकिय स्तरावर विशेष प्रयत्न केले तर नक्कीच जिल्हयातील उद्योग व्यवसायांना नवसंजिवनी मिळुन मोठया प्रमाणात नियमित रोजगार निर्माण होईल.

**संदर्भ सुची** :


- आर्थिक व सामाजिक समालोचन गोंदिया जिल्हा (वर्ष – २००९ , २०११ , २०१५)
- जनगणना पुस्तीका गोंदिया जिल्हा (वर्ष – २००१ , २०११)
- डॉ. तानाजीराव चोरगे – शेतपुरक उद्योग , बुकगंग दिलीपराज प्रकाशन (वर्ष – २०१५)
- Taware Pandurang , Director Marketing D.C. Pune
- विकिपीडीया गोंदिया जिल्हा